**महत्वाचे / तातडीचे**
**ई-मेल द्वारे**

जा.क्र.जिग्राविवंला/इंआयो/प्र.क्र.457/15
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर
दिनांक :- 09 /11/2015

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती,

**विषय : प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्हा स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त.**

संदर्भ : जिल्हा स्तरीय समिती बैठक दि.20/10/2016

उपरोक्त विषयान्वये सुचित करण्यात येते की, दि.20/10/2016 रोजी झालेल्या प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्हा स्तरीय समिती बैठकीमध्ये पंचायत समिती, निहाय जिल्हा स्ततराव प्राप्त झालेल्या प्रपत्र-क मधील लाभार्थींची पुर्नतपासणी करुन अहवाल मागविणे बाबत ठरविण्यात आलेले आहे.

त्यानुसार कळविण्यात येते की, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण बाबत प्रपत्र-क मधील लाभार्थीची पुर्न:तपासणी करुन दि.20/11/2016 पर्यंत अहवाल या कार्यालसास सादर करावा.

मुद्दे.

1. अपात्र असलेल्या कुटूंबाचे स्पष्ट कारण नमूद करावे.
2. पुर्वी संपुर्ण घरकुलाचा लाभ मिळाला असल्यास / पक्के घर असल्यास / कुटूंबात नौकरी असून मासिक उत्पन्न 10,000/- पेक्षा जास्त असले तरच अपात्र करावे.
3. जी कुटूंबे अपात्र होत आहेत त्यांची कशा मुळे ते अपात्र होत आहेत पंचनामन्यावर स्वाक्षरी घ्यावी.

**सोबत :-** जिल्हा स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त.

**प्रकल्प संचालक,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर**

**प्रत.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,लातूर यांना माहितीस्तव सविनय सादर.**

**प्रकल्प संचालक,**
**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,लातूर**

## दि. 20/10/2016 रोजी झालेल्या प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत जिल्हा स्तरीय समिती बैठकीचे इतिवृत्त

दिनांक 20/10/2016 रोजी प्रधान मंत्री आवास योजना- ग्रामीण जिल्हा स्तरीय समितीची बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर यांचे अध्यक्षतेखाली सकाळी 11.00 वाजता घेण्यांत आली. बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयाची चर्चा करण्यांत आली.

बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद लातूर — समिती अध्यक्ष
2. मा. श्री. रामचंद्र तिरुके — सदस्य
3. प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर — सदस्य सचिव

बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण साठी SECC 11 अंतर्गत शासनाकडून प्राप्त झालेल्या Auto Generated Priority याद्यानुसार पात्र/अपात्र याद्याबाबत चर्चा करण्यांत आली.

Auto Generated Priority डेटानुसार जिल्हयातील एकूण 15532 कुटुंबसंख्या आहे त्यापैकी 5 नगर पंचायतींची कुटुंबसंख्या 310 वजा जाता उर्वरित कुटुंबसंख्या 15222 पैकी 10821 कुटुंबे प्रपत्र ब नुसार पात्र आहेत . तसेच 3360 कुटुंबे विविध कारणामुळे अपात्र आहेत. अद्याप 1041 कुटुंबाची अ, ब व क मधील माहिती अप्राप्त आहे.

| Sr. No. | Block | Total No. of households | प्रपत्र ब पात्र लाभार्थी | | | | | प्रपत्र क अपात्र लाभार्थी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अजा | अज | अल्प संख्यांक | इतर | एकूण | अजा | अज | अल्प संख्यांक | इतर | एकूण |
| 1 | लातूर | 1722 | 414 | 47 | 119 | 616 | 1196 | 107 | 7 | 24 | 159 | 297 |
| 2 | औसा | 1892 | 344 | 18 | 140 | 915 | 1411 | 179 | 10 | 26 | 181 | 396 |
| 3 | निलंगा | 2397 | 436 | 91 | 136 | 1092 | 1755 | 196 | 20 | 54 | 204 | 474 |
| 4 | उदगीर | 3265 | 975 | 54 | 356 | 894 | 2279 | 613 | 15 | 113 | 225 | 966 |
| 5 | अहमदपूर | 1333 | 257 | 17 | 79 | 418 | 771 | 102 | 1 | 23 | 104 | 230 |
| 6 | चाकूर | 1258 | 330 | 39 | 114 | 476 | 959 | 108 | 5 | 28 | 95 | 236 |
| 7 | रेणापूर | 1218 | 256 | 11 | 51 | 445 | 763 | 112 | 28 | 11 | 200 | 351 |
| 8 | देवणी | 822 | 82 | 33 | 75 | 231 | 421 | 36 | 16 | 49 | 77 | 178 |
| 9 | जळकोट | 1313 | 383 | 32 | 53 | 583 | 1051 | 112 | 9 | 11 | 50 | 182 |
| 10 | शिरुर अं. | 312 | 80 | 17 | 21 | 97 | 215 | 20 | 1 | 6 | 23 | 50 |
| | एकूण | **15532** | **3557** | **359** | **1144** | **5767** | **10821** | **1585** | **112** | **345** | 1318 | 3360 |

1. पात्र 10821 कुटुंबांना वर दर्शविलेल्या तालुकानिहाय संख्येप्रमाणे मान्यता देण्यांत आली.
2. तालुकानिहाय दर्शविण्यांत आलेल्या एकूण 3360 कुटंब अपात्र दर्शविलेले आहेत. ती सर्व 3360 प्रकरणे Appeal आहेत असे समिती गृहीत धरत आहे. त्यानुसार ही प्रकरणे गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी प्रकरण निहाय चौकशी करुन दिनांक 15 नोव्हेंबर 2016 पर्यंत अहवाल सादर करावा.
3. अद्याप अप्राप्त असलेल्या 1041 कुटुंबाची अ, ब व क मधील माहिती गट विकास अधिकारी यांचेकडून तात्काळ मागवून घ्यावी.
4. वेळोवेळी प्राप्त होणा-या प्रकरणांत " **ब** " ही मान्यता ग्राहय धरुन "क "बाबत पूर्ण शहानिशा झाल्याशिवास अपात्र करुन नये असे बैठकीमध्ये ठरले.
5. सदरील " **ब** " प्रमाणे आता देण्यांत येत असलेल्या मान्यतेनुसार संवर्गनिहाय प्रधान्यक्रम याद्या बनविण्यास मान्यता देण्यांत आली व संवर्गनिहाय याद्या आवासॉफटवर अपलोड करण्यास मान्यता देण्यांत आली.

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, लातूर

श्री. रामचंद्र तिरुके,
सदस्य

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद लातूर